UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

**CURRENT GLOBAL REVIEWER**

**Half Yearly** Nov. 2017-Apr. 2018 | **UGC Approved** | **ISSN : 2319 - 8648**
Issue X Vol IV, March. 2018 | **Sr. No. 64310** | **Impact Factor : 2.143**


| | | | |
|---|---|---|---|
| 17 | धार्मीक आतंकवाद और विश्व राजनीती | विश्वनाथ हणमंतराव पवार | 79 |
| 18 | अज्ञेय की कहानियों में व्यक्त देश-विभाजन की त्रासदी | प्रा.आर.एम.खराडे | 82 |
| 19 | आधुनिक नारी की सशक्त तस्वीर - दौड | प्रा.डॉ.राजश्री भामरे | 87 |
| 20 | फणीश्वरनाथ रेणु की कहानियों में आँचलिकता का चित्रण | प्रा. सूर्यवंशी एस. एम. | 91 |
| 21 | "कबीर और उनकी सामाजिक चेतना वर्तमान के संदर्भ में" | नैन सिंह | 96 |
| 22 | "भारत सरताज़ जम्मू –कश्मीर के पर्यटक–स्थलों में पर्यटक और पर्यटन की संभावनाएं एवं चुनौतियां" | रवि कुमार | 100 |
| 23 | 'मैं घूमर नाचूँ' उपन्यास में प्रताड़ित नारी | डॉ. एकता रानी | 112 |
| 24 | मीडिया का सामाजिक दायित्व | पूजा शर्मा | 114 |
| 25 | मीडिया और बाज़ार | दीपिका शर्मा | 116 |
| 26 | वैश्वीकरण के परिप्रेक्ष्य में राम – विशेष संदर्भ तुलसीदास | सुशील कुमार | 119 |
| 27 | हिन्दी उपन्यासों में चित्रित देश प्रेम की भावना | दीपू शर्मा | 124 |
| 28 | भारतीय व्यवस्था आणि जागतिकीकरण (Indian system and Globalization) | प्रा.डॉ महेश नारायण मोटे | 127 |
| 29 | स्त्री-मुक्तीदाते राजर्षी शाहू महाराज | डॉ.एस.पी. गायकवाड | 135 |
| 30 | संल्लेखना : अध्यात्मिक व नैसर्गिक दृष्टीकोन | प्रा. शाहुराज नानाराव यादव | 139 |
| 31 | स्वातंत्र्योत्तर हिन्दी उपन्यास साहित्य में नारी का स्थान | डॉ. शेषराव लिंबाजी राठोड | 141 |
| 32 | उमरी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या स्थितीचा अभ्यास | श्री. सदानंद राजाराम वडजे<br>प्रा.डॉ.एच.एस.पतंगे | 144 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

**Half Yearly** Nov. 2017-Apr. 2018 | **UGC Approved** | **ISSN : 2319 - 8648**
Issue X Vol IV, March. 2018 | **Sr. No. 64310** | **Impact Factor : 2.143**

# स्त्री-मुक्तीदाते राजर्षी शाहू महाराज

**डॉ.एस.पी. गायकवाड**
प्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय,लातूर

-------- (29) --------

जगाच्या इतिहासात अशी काही माणसे असतात, जी लोकांच्या प्रती असणारी तळमळ, मानवतावादी दृष्टिकोन यातून अल्पावधीतच जगावर राज्य करतात. शाहू महाराज हे त्याच पठडीतले राजे होते. मनू आणि त्यांच्या मागून आलेल्या शास्त्रकारांनी कनिष्ठ जातीच्या लोकांना जीवन जगण्याचा अधिकार आणि विद्या मंदिराचे दरवाजे बंद केले. हा बंद दरवाजा आणि असमानतेची तटबंदी फोडण्यासाठी शाहू महाराजांनी प्रचंड ताकदीनिशी जुनाट बुरूजांना धडाका दिला. त्यात त्यांना रक्तबंबाळ व्हावे लागले. पण परिवर्तनाची बांधिलकी असलेल्या या राजाने परिस्थितीशी सामना करत मानव जातीच्या कल्याणासाठी युगांतराचा जिहाद पुकारला. राजकीय बाबतीत शिवरायांचा वारसा तर सामाजिक सुधारणांबाबत महात्मा फुलेचा वारसा अगदी समर्थपणे शाहू महाराजांनी चालविला. सयाजीराव गायकवाड महाराजांचा अपवाद वगळता तत्कालीन हिंदुस्थानात असलेल्या ७०० संस्थानिकांमध्ये महाराजांची बरोबरी करू शकेल असा एकही संस्थानिक झाला नाही. आजच्या काळात जेव्हा सामान्य लोकांना राजकारणाविषयी चीड निर्माण होत आहे. राजकारण हे गुंडगिरीचे अड्डे बनत आहेत. राज्यकर्ते सत्तेचा वापर संपत्ती प्राप्त करण्यासाठी, चैनीसाठी करत आहेत. कॉमनवेल्थ गेम, काळा पैसा, आदर्श सोसायटी, २ जी स्पेक्ट्रम अशी कितीतरी उदाहरणे राजकारणातील राज्यकर्त्यांची काळी बाजू दाखवत आहेत. अशा सर्व भ्रष्ट राज्यकर्त्यांसाठी आधुनिक राजकीय व्यवस्था कशी चालवावी हा एक आदर्श शाहू महाराज देतात. आपल्याला लाभलेल्या सत्तेचा वापर जनकल्याणासाठीच करावयाचा असतो. हे लोकशाहीचे तत्त्व शाहू महाराजांकडून शिकायला मिळते.

सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि कायदेविषयक ज्या सुधारणा आपण स्वातंत्र्याच्या नंतर स्वीकारल्या त्याची सुरुवात ५० वर्षापूर्वीच शाहू महाराजांनी केली होती. यातून काळाच्या पुढे पाहण्याची त्यांची दूरदृष्टी दिसून येते. समाजातला स्त्रीवर्ग हा नेहमीच उपेक्षित, शोषित राहिला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांनीच संस्कृती जपण्याची अपेक्षा समाज करीत. संस्कृती जपण्याच्या अपेक्षेतूनच अनेक रुढी प्रथा परंपरेचे जोखड स्त्रीवर लादण्यात आले आणि त्याचे जबरदस्तीने पालन स्त्रियांकडून केले जावू लागले. त्यातूनच बालविवाह, पडदा पध्दती, विधवा विवाहास प्रतिबंध, केशवपन, अनेक सामाजिक निर्बंध इ. मुळे स्त्रियांचे जीवन असहाय्य व परावलंबी बनले, लाचार बनले. स्त्री जीवनाच्या या दुर्दशेची जाणीव महाराष्ट्रात महात्मा फुलेंना झाली आणि त्यांनी स्त्रियांची या गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी स्त्री शिक्षणाचे हत्यार उपसले. यात अखिल भारतीय स्तरावरचे समाजसुधारक राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र सेन, महर्षी कर्वे, म.गो. रानडे, आगरकर व लोकहितवादी इ. विचार व कार्य स्त्रियांच्या उध्दारासाठी महत्त्वपूर्ण ठरले. शाहू महाराजांनी देखील आपले संपूर्ण आयुष्य स्त्री उध्दार व बहुजनांच्या उध्दारासाठी खर्ची घातले. त्यामुळे बहुजनवर्गाला व स्त्रियांना शाहू महाराज नव्या युगाच्या आगमनाचे अग्रदूतच वाटले. खरेच शाहू महाराजांनी बहुजनांना व स्त्रियांना माणूस म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सत्तेच्या बळावर नवीन युगच अवतारून आणले होते.

**स्त्री शिक्षण**

महात्मा फुले व सावित्रीबाईंनी सुरू केलेली स्त्री शिक्षणाची चळवळ ही स्त्री मुक्तीचीच चळवळ होती. फुलेंच्या स्त्रीमुक्तीच्या ध्येयवादाला शासकीय ठरावाचा आधार देण्यासाठीच जणू महाराजांचा जन्म झाला होता. चातुवर्ण्य व्यवस्थेच्या जोखडाखाली अडकलेल्या भारतीय हिंदू समाजात स्त्री व शुद्रांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला होता. त्यामुळे वेदिक कालाव्यतिरिक्त इतिहासात स्त्री शिक्षणाचा उल्लेख होत नाही. ज्या काळात मुलाच्या शिक्षणाची सोय नव्हती त्या काळात मुलींच्या शिक्षणाचा विचार दुरापास्त होता. बालविवाहाची पध्दत, पडदा पध्दती इत्यादी कुप्रथा स्त्रियांवर लादल्या गेल्याने या सर्व पध्दतीचा संकलित परिणाम म्हणजे स्त्री शिक्षणाची नेहमीच हेळसांड झाली पण स्त्री शिक्षणामुळेच व समाजाचा कुटुंब व समाजाचा विकास घडून येण्यास मदत होते. तसेच स्त्रियांना कुटुंब व समाजात आदर व मानाचे स्थान प्राप्त होते. याची शाहू महाराजांना कल्पना होती. त्यासाठीच स्त्री शिक्षणाकडे त्यांनी

**CURRENT GLOBAL REVIEWER**

**Half Yearly** Nov. 2017-Apr. 2018 | **UGC Approved** | **ISSN : 2319 - 8648**
Issue X Vol IV, March. 2018 | **Sr. No. 64310** | **Impact Factor : 2.143**

एका अर्थाने लोकशाहीचे उपासक होते, लोकराजे होते. फुले-शाहू-आंबेडकरांच्या स्त्री उध्दारात्मक कार्यातून स्त्री सबलीकरणाला निश्चितच चालना मिळालेली आहे. पण आजही आपल्या देशातील स्त्रियांवरील अत्याचार, हुंडाबळी, स्त्री-भ्रूण हत्या, बलात्कार इत्यादी प्रकार होत आहेत. फुले-शाहू-आंबेडकरांची सुधारणावादी परंपरा लाभलेला आपल्या देशात स्त्रियांच्या बाबतीत असे अत्याचाराचे प्रकार निश्चितच लज्जास्पद बाब आहे. आजची समाजाचा स्त्रियांप्रती असणारा संकुचित दृष्टिकोन दूर झालेला नाही. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या प्रतिमेचे फक्त पूजन, भाषण, लेख इथपर्यंतच आपण या महान महापुरुषांचे विचार संकुचित ठेवायचे आहेत काय? या समाजसुधारकांनी स्त्रियांना दिलेला *मान, प्रतिष्ठा व त्यातून स्त्रीमुक्तीचे खुले करून दिलेले द्वार आपण आपल्या संकुचित विचाराने बंद करायचे नाही तर* स्त्रियांनाअधिक जोमाने, उत्साहाने पुढे जाण्यासाठी त्यांचा आदर, सन्मान, सहकार्य करणे आवश्यक आहे. आधुनिक काळात मोठया प्रमाणात स्त्रियांची समाजात होणारी कुचंबना दूर करण्यासाठी फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचाराचे बळ लाभलेल्या आपल्यासारख्या या समाजपुरुषांच्या अनुयायांवर ही जबाबदारी येऊन पडली आहे. ही जबाबदारी पेलण्यासाठी पुढेही शाहूचे विचार व कार्य प्रेरणादारी ठरणार आहेत.

**संदर्भ**

१) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, तारायणी बुक सर्व्हिसेस
२) www.maaybolic.com रयतेचा राजा शाहू महाराज, २६ जून २०१२
३) महाराष्ट्र टाईम्स-क्रांतिकारी विचारांच वारसा, २६ जून २०१९
४) m-marathi.webduniya.com लोकराजा राजर्षी शाहू महाराज, ६ मे २०१७
५) www.bbc.com - जेव्हा छत्रपती शाहू महाराज गंगाराम कांबळेंच्या हॉटेलात चहा प्यायला जातात.
६) divyamarathi.bhaskar.com राजर्षी शाहू महाराजांनी दिली होती अस्पृश्यांना मराठे व ब्राम्हणांची आडनावे, २६ जून २०१८

Current Global Reviewer

ISSN 2319-8648

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

UGC Approved Journal
Sr. No. 64310



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in